नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक ३०/०७/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

## पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

पो.स्टे. कुही – दिनांक २८/०७/२०२२ चे ०३.०० वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादीयांची १७ वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक श्री देवीदास ठमके मो.क्र. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

## फसवणुक

पो.स्टे. कन्हान :– अंतर्गत टोपॉज लॉज कन्हान येथे दिनांक ०४/०६/२०२२ चे ११.०० वा. ते दिनांक ०५/०६/२०२२ चे १८.०० वा. दरम्यान फिर्यादी वय २२ वर्षे हिचे घरी दि. २८/७/२२ रोजी पोलीसांनी येवुन विचारले की, ‘दि. ०४/०६/२०२२ रोजी अप क्र. ३३८/२२ गुन्हयातील आरोपी नामे– अनिल रमेश मनघटे वय ३० वर्ष, रा. बोर्डा कन्हान याने टोपाज लॉज कन्हान येथे फिर्यादीचे नावाचे आधार कार्ड प्रत तेथील काउंटर वर दिला असुन त्यास ओळखता का’ असे विचारलेवरून फिर्यादीने सांगितले की, ‘मी अनिल मनगटे यास ओळखत नाही आणि माझे नावाचा आधारकार्ड झेरॉक्स कोठुन आणला व टोपॉज लॉज येथे कसे काय दिली हे मला माहीत नाही’ दि. ०४/०६/२०२२ रोजी दि. ०५/०६/२०२२ रोजी फिर्यादी हि तिचे घरी हजर होती. आरोपीने फिर्यादीच्या आधारकार्डचा गैरवापर करून फिर्यादीची फसवणुक केली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ४२० भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरु आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सपोनि श्री सतिश मेश्राम हे करीत आहे.

## अकस्मात मृत्यू

पो.स्टे. कोंढाळी :– **सौ.छबीबाई अशोक वाघाडे(मृतक), वय ५६ वर्ष, रा. शेकापुर ता. काटोल जि. नागपुर** ही २० वर्षापासुन मनोरूग्ण असुन तिचा उपचार प्रादेशिक मनोरूग्णालय नागपुर येथे सुरू असता दि. २८/०७/२२ रोजी रात्री ०२/०० वा. दरम्यान तिने तिच्या पागलपणच्या भरात विषारी औषध स्वताह प्राषण केले. तिची प्रकृती खराब झाल्याने तिला उपचारकामी मेडीकल कॉलेज नागपुर येथे नेले असता तेथील डॉक्टरांनी तपासुन मरण पावल्याचे सांगितले.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– चंद्रशेखर अशोक वाघाडे, वय ३१ वर्ष, रा. शेकापुर ता. काटोल जि. नागपुर यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कोंढाळी येथे कलम १७४ जाफौ कायद्यान्वये मर्ग नोंद केलेला असून पुढील तपास पोलिस नाईक किशार लोहित मो.क्र. ९१४६४२२६३३ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर